**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३९/२०२२</u>**

**<u>निशाणी ३२</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी</u>**

**मी शपथेवर निवेदन करतो की,**

**नाव –** श्री. दिपक शामराव गर्जे,

**वय – ४२** वर्षे **व्यवसाय – पोलिस हवालदार ब.नं.१४०३**

**रा. इस्लामपूर. ता. वाळवा, जिल्हा – सांगली.**

**<u>सरतपासणी वादीतर्फे श्री. एस. एम. नवाळे विधीज्ञ यांचेतर्फे.</u>**

मी ऑगस्ट २०२४ पासून इस्लामपूर पोलिस ठाण्यात पोलिस हवालदार म्हणून कार्यरत आहे. आमच्या कार्यालयात साक्षी समन्स आले होते. साक्षीकामी मी आज सन २००६ चे मिसिंग रजिस्टर आणले आहे.

आता मला निशाणी १७ सोबत जोडलेला दस्त क्र.१ दिनांक ३१/०३/२००६ चे कव्हरिंग लेटरची सत्यप्रत दाखवली, त्यावर पोलिस ठाण्याचा शिक्का असून तत्कालीन अधिकाऱ्याची सही आहे.

न्यायालय प्रश्न – तुम्ही सदर दस्तावरील अधिकाऱ्याची सही ओळखता का ?
उत्तर – नाही.

सदर दस्तामधील मजकूर मुळ रजिस्टरमधील मजकूरानुसार सत्य व बरोबर आहे, (त्यास दस्त ओळखीपुरती **निशाणी ३३** देण्यात येते).

आता मला निशाणी १७ सोबत जोडलेला दस्त क्र.२ तपास यादीची सत्यप्रत दाखवली, त्यावर पोलिस ठाण्याचा शिक्का असून तत्कालीन अधिकाऱ्याची सही आहे.

न्यायालय प्रश्न – तुम्ही सदर दस्तावरील अधिकाऱ्याची सही ओळखता का ?
उत्तर – नाही.

सदर दस्तामधील मजकूर मी सोबत आणलेल्या कार्बन प्रतीमधील मजकूरानुसार सत्य व बरोबर आहे, (त्यास दस्त ओळखीपुरती **निशाणी ३४** देण्यात येते).

आता मला निशाणी १७ सोबत जोडलेला दस्त क्र.३ राजेंद्र तुकाराम माळी यांच्या जबाबाची सत्यप्रत दाखवली, त्यावर पोलिस ठाण्याचा शिक्का असून तत्कालीन अधिकाऱ्याची सही आहे.

न्यायालय प्रश्न – तुम्ही सदर दस्तावरील अधिकाऱ्याची सही ओळखता का ?
उत्तर – नाही.

सदर दस्तामधील मजकूर मुळ रजिस्टरमधील मजकूरानुसार सत्य व बरोबर आहे, (त्यास दस्त ओळखीपुरती **निशाणी ३५** देण्यात येते).

आता मला निशाणी १७ सोबत जोडलेला दस्त क्र.४ विश्रांती राजेंद्र माळी यांच्या जबाबाची सत्यप्रत दाखवली, त्यावर पोलिस ठाण्याचा शिक्का असून तत्कालीन अधिकाऱ्याची सही आहे.

न्यायालय प्रश्न – तुम्ही सदर दस्तावरील अधिकाऱ्याची सही ओळखता का ?
उत्तर – नाही.

सदर दस्तामधील मजकूर मुळ रजिस्टरमधील मजकूरानुसार सत्य व बरोबर आहे, (त्यास दस्त ओळखीपुरती **निशाणी ३६** देण्यात येते).

आता मला निशाणी १७ सोबत जोडलेला दस्त क्र.५ विश्रांती राजेंद्र माळी यांच्या वर्दी जबाबची सत्यप्रत दाखवली, त्यावर पोलिस ठाण्याचा शिक्का असून तत्कालीन अधिकाऱ्याची सही आहे.

न्यायालय प्रश्न – तुम्ही सदर दस्तावरील अधिकाऱ्याची सही ओळखता का ?
उत्तर – नाही.

सदर दस्तामधील मजकूर मुळ रजिस्टरमधील मजकूरानुसार सत्य व बरोबर आहे, (त्यास दस्त ओळखीपुरती **निशाणी ३७** देण्यात येते).

(वादीचे विद्वान विधीज्ञ कागदपत्र दाखल करत आहेत)

आता मला निशाणी ३९ सोबत जोडलेले प्राधिकृत पत्र दाखविले, त्यावर पोलिस निरिक्षक, इस्लामपूर पोलिस ठाणे यांची सही असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ४०** देण्यात येते ).

मिसिंग ०६/२००६ या क्रमांकावर नोंद झाली होती. कागदपत्रावरुन असे दिसते की, मिसिंग व्यक्ती दिनांक ३१/०३/२००६ रोजी सापडली. त्यानंतर तक्रारदार व मिसिंग व्यक्तीचे जबाब घेतल्याचे दिसते.

**दावा एकतर्फा असल्यामुळे उलटतपास काही नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2025.11.13 18:11:16 +0530

**इस्लामपूर** **(भगवान म. कारलेकर )**

**दिनांक – १३/११/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**

सदरचा जबाब साक्षीदारास वाचून दाखविला. तो त्याने खरा व बरोबर असल्याचे मान्य केले.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2025.11.13 18:11:21 +0530

**इस्लामपूर.** **( भगवान म. कारलेकर )**

**दिनांक – १३/११/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**